**परिपत्रक क्र. ४२**

**इ. ११ वी पहिली सत्र व इ.१२ वी पहिली सहामाही परीक्षा सन २०१८-२०१९.**

**रयत शिक्षण संस्था, सातारा**
कर्मवीर समाधी परिसर,सातारा
**माध्यमिक आस्थापना परीक्षा विभाग**
**परिपत्रक क्र. ४२ दिनांक ०२ /१०/२०१८**

**योग्य त्या कार्यवाहीसाठी**

सर्व शाखाप्रमुख,
उच्च माध्यमिक विद्यालये(फक्त माध्यमिक विद्यालयास संलग्न असलेली)
रयत शिक्षण संस्था.

यांच्याकडे ----

संदर्भ :- १) इ. ११ वी पुनर्रचित अभ्यासक्रम व मूल्यमापन योजना परिपत्रक क्र.रा.मं./संशोधन/पुनर्रचित अभ्यासक्रम/३७१२/ दिनांक २५/५/२०१२.
२) इ.१२ वी सुधारित मूल्यमापन योजना परिपत्रक क्र.रा.मं./पापुई/उच्चीकृत अभ्यासक्रम मूल्यमापन योजना/७६०/दिनांक २३/१/२०१२.
३) शिक्षण संक्रमण अंक - ऑगष्ट २०१७ आणि सप्टेंबर २०१७.
४) इ.११ वी नवीन प्रश्नपत्रिका आराखडा परिपत्रक क्र.रा.मं./पा.पु.ई./पीसीबीएम/प्रश्नपत्रिका आराखडे/ २०१७-१८/३६२२ दि.१२/०७/२०१७

१) संस्थेमार्फत माध्यमिक विद्यालयांशी संलग्नित उच्च माध्यमिक विद्यालयांच्या (महाविद्यालयास जोडून असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांखेरीज) घेतल्या जाणाऱ्या इ.११ वी पहिली सत्र परीक्षा व इ.१२ वी सहामाही परीक्षा **दीपावली सुट्टीपुर्वी दिनांक** २३/१०/२०१८ **पासून सुरु होणार असून** या परीक्षेच्या वेळापत्रकाच्या दोन प्रती सोबत पाठविल्या आहेत.

२) या इ.११ वी पहिली सत्र परीक्षा व इ.१२ वी सहामाही परीक्षेच्या प्रश्नपत्रिका आपल्या गटप्रमुख शाखेकडे आपण मागणी केलेल्या आकडेवारीप्रमाणे दि. २०/१०/२०१८ पर्यंत पोहोच केल्या जाणार आहेत, याची नोंद घेऊन आपल्या विद्यालयाच्या प्रश्नपत्रिका दि. २०/१०/२०१८ पर्यंत आपल्या गटप्रमुख शाखेशी संपर्क साधून ताब्यात घ्याव्यात. तसेच प्रश्नपत्रिकेच्या गठ्ठयावर अंकानुसार प्रश्नपत्रिका कमी / जास्त असल्यास त्याबाबत आपल्या विभागीय कार्यालयाकडून पूर्तता करुन घ्यावी.

३) खालील विषयांच्या (इंग्रजी व मराठी माध्यमाच्या) इ.११ वी, १२ वीच्या प्रश्नपत्रिका पुरविल्या जाणार नाहीत. तरी संबंधित शाखांनी खालील विषयांच्या प्रश्नपत्रिका आपापल्या स्तरावर काढाव्यात व परीक्षा घेण्याची व्यवस्था करावी.
(१) भूगोल,अर्थशास्त्र (इंग्रजी माध्यम) (२) बिल्डिंग कन्स्ट्रक्शन
(३) क्रॉप प्रॉडक्शन (४) एज्युकेशन (५) संस्कृत.

४) किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका पुरविल्या जाणार नाहीत. सदर विषयांच्या प्रश्नपत्रिका संबंधित शाखेने काढून त्यांच्या सोयीनुसार ता. २३/१०/२०१८ ते ०२/११/२०१८ या काळात परीक्षा घ्याव्यात.

५) प्रात्यक्षिक परीक्षा लेखी परीक्षेपूर्वी अगर लेखी परीक्षेनंतर सोयीनुसार लगेच घ्याव्यात. या परीक्षेचा निकाल दिपावली सुट्टीनंतर लगेच जाहीर करावा.

६) लेखी परीक्षा निकाल (विषयवार) आपल्या विभागीय कार्यालयाकडे दिपावली सुट्टीनंतर नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवडयात पाठवावा.

महत्त्वाचे :-

७) वरील नमूद केलेल्या संदर्भानुसार प्रशिक्षणात निश्चित केलेल्या प्रश्नपत्रिका आराखाडा व मूल्यामापन योजनेनुसार इ.११ वी पहिली सत्र परीक्षा व इ.१२ वी सहामाही परीक्षेच्या प्रश्नपत्रिका काढलेल्या आहेत. याची नोंद घ्यावी.

८) गत चार वर्षापासून इ.११ वी व इ.१२ वीला पर्यावरण हा स्वतंत्र विषय शिक्षण खात्याकडून अंतर्भूत करण्यात आलेला आहे हे आपणास माहित आहेच. तथापि गतवर्षी इ. ११ वी आणि इ.१२ वीला पर्यावरण विषय लेखी परीक्षा बंद करण्यात आलेली आहे. याबाबत शिक्षण खात्याकडून आलेल्या परिपत्रकाने आपणास माहिती आहेच. तेंव्हा पर्यावरण विषयाची लेखी परीक्षा घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. **महत्वाचे :-** इ.११ वी पर्यावरण विषयाच्या प्रकल्प स्वरुपात कार्यवाही बाबत शाखा पातळीवर संबंधित विषय शिक्षकांनी कार्यवाही करावयाची आहे. (कार्यवाही संबंधातील सर्व तपशील आक्टोबर २०१२ च्या शिक्षण संक्रमण अंकात दिलेला आहे.)

याबाबत सर्व शाखाप्रमुखांनी मंडळाकडून तयार करण्यात येणाऱ्या पर्यावरण विषयाच्या क्रमिक पुस्तिकेची प्राप्ती करुन घ्यावी. आणि त्याचा बारकाईने अभ्यास करुन व उपलब्ध अभ्यासक्रमाचा वापर करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

१) तरी आपणास प्राप्त होणा-या सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिकांनुसार आपण आपल्या शाखेत सदरच्या परीक्षा- सोबत जोडलेल्या परीक्षा वेळापत्रकातील तारखांनुसार घ्यावयाच्या आहेत. याची नोंद घेऊन सदरच्या परीक्षा योग्य प्रकारे पार पाडाव्यात.

२) सदरचे परिपत्रक **http://www.rayatshikshan.edu** संस्था वेबसाईटवर माहितीसाठी व आपण आपल्या शाखेत करावयाच्या कार्यवाहीसाठी उपलब्ध आहे.

कळावे.

**सहसचिव (उ.शि.),**
**रयत शिक्षण संस्था,सातारा.**

सोबत : १) परीक्षा वेळापत्रक २ प्रती.

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :

१) सर्व इन्स्पेक्टर्स, रयत शिक्षण संस्था.
(टीप :- सदरचे परिपत्रक संस्थेच्या वेबसाईटवर पहावयास मिळेल. याची नोंद घेवून आपण आपल्या विभागातील गटप्रमुख शाखेला याबाबत कल्पना देवून माध्यमिक विद्यालयांना संलग्न असणा-या सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांनी संस्थेच्या वेबसाईटवरुन सदरच्या परिपत्रकाच्या प्रिंटेड कॉपी काढून घेण्याबाबत सूचना द्याव्यात.)

२) व्यवस्थापक, रयत प्रिंटिंग प्रेस, सातारा.

३) व्यवस्थापक, रयत प्रिंटिंग प्रेस, अहमदनगर.

**Examination Programme**

**Rayat Shikshan Sanstha, Satara**
Junior College Section.
Date: 29/09 /2018.

# PROGRAMME

FIRST SEMESTER EXAMINATION F.Y.J.C. std. XI 2018-2019
&
TERMINAL EXAMINATION S.Y.J.C.std.XII 2018-2019
(Arts, Science & Commerce with Vocational & Technical & Agri)

| Date | Time | Subject | Faculty | | | | Max. Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Arts | Commerce | Science | VOC | |
| 23/10/2018 | 7.30 to 9.30 | Marathi | √ | √ | √ | √ | 50 |
| 24/10/2018 | 7.30 to 9.30 | English | √ | √ | √ | √ | 50 |
| 25/10/2018 | 7.30 to 9.30 | Co-Operation | √ | √ | | | 50 |
| 26/10/2018 | 7.30 to 9.30<br>7.30 to 9.30 | Physics<br>Economics | <br>√ | <br>√ | √ | | 50 |
| 27/10/2018 | 7.30 to 9.30<br>7.30 to 9.30 | Sociology<br>Secretarial Practice | √ | <br>√ | | | 50<br>50 |
| 29/10/2018 | 7.30 to 9.30<br>7.30 to 9.30<br>7.30 to 9.30 | Chemistry<br>History<br>Book Keeping & A/C | <br>√ | <br><br>√ | √ | | 50<br>50<br>50 |
| 30/10/2018 | 7.30 to 9.30 | Hindi | √ | √ | √ | | 50 |
| 31/10/2018 | 7.30 to 9.30<br>7.30 to 9.30<br>7.30 to 9.30 | Biology<br>Political Science<br>Org.Of Commerce | <br>√ | <br><br>√ | √ | | 50<br>50<br>50 |
| 01/11/2018 | 7.30 to 9.30 | Geography | √ | √ | √ | | 50 |
| 02/11/2018 | 7.30 to 9.30<br>7.30 to 9.30 | Psychology<br>Mathematics | √ | <br>√ | <br>√ | | 50<br>50 |

Note :- Papers & Practicals for Vocational Courses and other subjects not mentioned in the Time table should be arranged between .23 rd October 2018 to 02 nd November 2018.

सूचना :- या व्यतिरिक्त या वर्षापासून Bifocal शाखेमध्ये मोडणारे विषय- उदा. कॉम्पुटर सायन्स, इलेक्ट्रानिक्स, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी इ. सुरु केले असल्यास सदर विषयांच्या प्रश्नपत्रिका त्या शाखेमधील विषय शिक्षकांनी बोर्ड पॅटर्ननुसार काढावयाच्या आहेत. सदर विषयांची परीक्षा दि. 23/10/2018 to 02/11/ 2018 या कालावधीत शाखा पातळीवर घेण्यात यावी.

Please Note the following:

| Sr.No. | Subject | F.Y.J.C.(XI) |
|---|---|---|
| 1. | Mathematics | 50 |
| 2. | Physics | 50 |
| 3. | Chemistry | 50 |
| 4. | Biology | 50 |
| 5. | Language Subjects + Geography | 50 Each |
| 6. | Other Subjects | 50 Each |

√ applicable

Joint Secretary (H.Edn.)
Rayat Shikshan Sanstha,Satara.

Head of the Institution.